**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**[१९९६] २ एस. सी. आर. ९७९**

**असोसिएशन ऑफ केमिकल वर्कर्स इतर**

**विरुद्ध**

**एस. डी. राणे आणि इतर**

**२२ फेब्रुवारी १९९६**

**[न्यायमूर्ति के. रामास्वामी आणि न्यायमूर्ति जी. बी. पटनायक]**

*महाराष्ट्र कामगार संघटनेची मान्यता आणि अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध अधिनियम, १९७१ :*

*कलम १४ - कामगार संघटनेची मान्यता - तपास अधिकाऱ्याने स्वीकारलेली कार्यवाही - कामगारांच्या गटाने आव्हानित केले - औद्योगिक न्यायालय आणि उच्च न्यायालया यांनी तपास अधिकाऱ्याचा अहवाल जो स्वीकारला होता, त्यात हस्तक्षेप केला नाही - अपीलावर असा निर्णय देण्यात आला की कलम १४ खाली दोन वर्षांसाठी नव्याने अर्ज करण्यास प्रतिबंध आहे - औद्योगिक न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशाच्या तारखेपासून एका वर्षाच्या आत अर्ज करणे देखील प्रतिबंधित आहे - न्यायाधिकरणाचा आदेश १९८३ मध्ये पारित करण्यात आला होता आणि पुरेसा वेळ निघून गेला असल्याने, कलम १४ अंतर्गत अवरोध यापुढे उपलब्ध नाही – अपीलकर्ता- संघाने अजूनही मान्यता मागितल्यास अधिनियमानुसार उपलब्ध असलेल्या प्रक्रियेचा अवलंब करण्यास ते त्यांना खुले असेल.*

*ऑटोमोबाईल प्रॉडक्ट्स ऑफ इंडिया एम्प्लॉइज युनियन -विरुद्ध - असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कर्स बॉम्बे,* **[१९९०] २ एससीसी ४४४ आणि** *असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कर्स - विरुद्ध - डॉकयार्ड लेबर युनियन अँड इतर,* **[१९९५] पुरवणी ४ एससीसी ५४४**, यावर अवलंबून होते.

दिवाणी अपिलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक - १२२६/१९९६.

रिट याचिका क्रमांक ३०३८/१९८३ मधील मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक ७/९/१९८३ च्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी, नारायण शेठे, मनोज वाड, सुश्री जे. एस. वाड आणि सुश्री उषा रेड्डी.

उत्तरवादी क्रमांक ३ साठी, आर. के. हब्बू, पी. बी. अग्रवाल, सतीश अग्रवाल.

न्यायालयाचा पुढील आदेश देण्यात आलाः

रिट याचिका क्रमांक ३०३८/१९८३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने दिनांक ७ सप्टेंबर १९८३ रोजी दिलेल्या आदेशावरून विशेष अनुमतीने हे अपील उद्भवते. अपीलकर्ता मेसर्स केमिकल्स अँड फायबर्स ऑफ इंडिया लिमिटेड [पूर्वी आय.सी.आय. इंडिया लिमिटेड] अंतर्गत एक प्रतिस्पर्धी कामगार संघटना आहे. औद्योगिक न्यायालयाने त्यांच्या आदेशात असे निदर्शनास आणून दिले होते की १५ जून १९८१ रोजी एकूण कर्मचारी ८११ होते आणि उत्तरवादी-संघाचे संख्याबळ ४४८ होते, तर अपीलकर्ता-प्रतिस्पर्धी संघाचे संख्याबळ २४१ होते. त्यामुळे ते एक मान्यताप्राप्त संघ मानले गेले. महाराष्ट्र कामगार संघटनेची मान्यता आणि अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध अधिनियम, १९७१ (१९७१ चा अधिनियम - १) (थोडक्यात, 'एम. आर. टी. यू. पी. यू. एल. पी. अधिनियम ') अंतर्गत तपासी अधिकाऱ्याने अंगीकृत केलेल्या कार्यवाहीला अपीलकर्त्याने आव्हान दिले होते.

अपीलकर्त्याचे विद्वान वकील श्री कैलाश वासदेव यांनी असा युक्तिवाद केला की तपास अधिकाऱ्याने जागेची पडताळणी करणे आणि कर्मचाऱ्यांना पर्यायी क्रमांकाने कॉल करणे आणि त्याची पडताळणी करणे कायद्याने उचित नव्हते आणि त्यामुळे ही प्रक्रिया स्पष्टपणे बेकायदेशीर आहे. हे वादातीत नाही की तपास अधिकाऱ्याने अधिनियमान्वये विहित केलेल्या प्रक्रियेनुसार तपास करणे आवश्यक आहे. *ऑटोमोबाईल प्रॉडक्ट्स ऑफ इंडिया एम्प्लॉइज युनियन - विरुद्ध - असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कर्स बॉम्बे,* [१९९०] २ एससीसी ४४४ मध्ये या न्यायालयाने असा निर्णय दिला होता की मान्यतेशी संबंधित योजना अधिनियमानुसार करण्यात यावी. जरी पक्षांनी गुप्त मतपत्रिकेद्वारे कंपनीमधील कर्मचाऱ्यांची संख्या ओळखण्यास संमती दिली असली तरी, त्या पद्धतीला अधिनियमाने समर्थन दिले नव्हते आणि संमतीने अधिनियमानुसार विहित न केलेल्या प्रक्रियेच्या बदलीची बेकायदेशीरता दूर केली नाही. *असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कर्स - विरुद्ध - डॉकयार्ड लेबर युनियन अँड इतर,* [१९९५] पुरवणी ४ एससीसी ५४४ या प्रकरणात या न्यायालयाने याच दृष्टिकोनाचा पुनरुच्चार केला होता. परिणामी, तपास कार्यालयाने अधिनियमांतर्गत विहित केलेल्या प्रक्रियेनुसार तपास करणे आवश्यक आहे.

या प्रकरणात औद्योगिक न्यायालयाने १७ नोव्हेंबर १९८० रोजी दिलेल्या आदेशानुसार तपास अधिकाऱ्याला पक्षांना संधी देण्याचे आणि त्यानंतर ५ ऑक्टोबर १९७९ रोजी दिलेल्या आधीच्या आदेशानुसार चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. त्याच्या पुरःसरणार्थ, तपास अधिकाऱ्याने अपीलकर्त्याला

तसेच उत्तरवादी-संघाला संबंधित संघटनांच्या सदस्यांची यादी सादर करण्यास सांगितले, त्याने सुरुवातीला याद्यांची पडताळणी केली होती आणि त्यानंतर त्या आधारावर जागेची पडताळणी केली होती. त्यांनी एक अहवाल सादर केला ज्यामध्ये असे म्हटले आहे की, "माननीय सदस्य, औद्योगिक न्यायालया यांनी दिलेल्या निर्देशानुसार, खालील स्वाक्षांकीत व्यक्तीने प्रत्येक संघटनेच्या दोन प्रतिनिधींच्या आणि अर्जदार नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत घटनास्थळी चौकशी केली". "संबंधित संघटनांच्या एकूण संख्येचा हा अहवाल औद्योगिक न्यायालयाने स्वीकारला आणि संक्षिप्त आदेशाद्वारे, अत्यंत तर्कशुद्ध आदेशाद्वारे तो कायम ठेवण्यात आला यात शंका नाही. अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर द्विसदस्यीय खंडपीठाला अधिनियमातील कोणतीही त्रुटी लक्षात आलेली नसल्याने, त्यांनी त्यात हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे हे अपील दाखल करण्यात आले.

अधिनियमाच्या कलम १४ अंतर्गत, नव्याने अर्ज करण्यास दोन वर्षांच्या कालावधीसाठी प्रतिबंध करण्यात आले होते; औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या तारखेपासून एका वर्षाच्या आत आणखी अर्ज करण्यास प्रतिवबंध करण्यात आले होते .दुसऱ्या शब्दांत, दोन वर्षांच्या कालावधीनंतर, जर कोणत्याही प्रतिस्पर्धी संघटनेने कोणतीही मान्यता मागितली, तर औद्योगिक न्यायालयाने अधिनियमाच्या कलम १४ अंतर्गत विहित केलेल्या प्रक्रियेचे पालन करणे आणि नंतर अधिनियमानुसार निर्णय घेणे आवश्यक आहे. सन १९८३ मध्ये औद्योगिक न्यायालयाने हा आदेश पारित केल्यामुळे आणि पुरेसा वेळ आधीच निघून गेल्यामुळे, अधिनियमाच्या कलम १४ अंतर्गत अवरोध आता उपलब्ध नाही. त्यामुळे, जर अपीलकर्ता अजूनही अधिनियमाच्या तरतुदींनुसार अपीलकर्ता-संघाची कोणतीही मान्यता मागत असेल, तर अधिनियमानुसार उपलब्ध असलेली प्रक्रिया अंगीकृत करण्यास तो खुला असेल.

त्यानुसार अपील खारीज करण्यात येते. खर्चाबाबत आदेश नाही.

अपील खारीज करण्यात आले.

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".